

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय

(सेतू - शाखा)

कॉम्प्लेक्स एरीया, चंद्रपुर रोड गडचिरोली पिन कोड क्रमांक 442605

दुरध्वनी क्रमांक 07132-222005 ईमेलआयडी - rdcgadchiroli@gmail.com

क्रमांक /कार्या-7/म.स. सेतू/कावि 2145/2026 दिनांक - 16 ऑक्टोबर, 2026

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी,
गडचिरोली

विषय :- मिनी सेतू केंद्रांत (आपले सरकार सेवा केंद्र) केंद्रचालकाची नियुक्तीकरीता प्रेस नोट वृत्तपत्रामध्ये प्रकाशित करणेबाबत.

संदर्भ :-1. माहिती तंत्रज्ञान (सा. प्र.वि.) विभाग शासन निर्णय क्र. मातंसं - 1716 / प्र.क्र. 517 / 39, दि. 19 जाने. 2018

2. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे शासन शुद्धीपत्रक क्रमांक:आसेकें-2026/प्र.क्र.98/TECH-1 (E-1742666) दिनांक 9 जुलै ,2026

3. शासन निर्णय क्रमांक: मिसेकें-2026/प्र. क्र. 80/TECH-1 (E-1730492)दिनांक -16 जुलै, 2026

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील विद्यमान 13 दादालोरा खिडकी केंद्रे व 9 आदि सेवा केंद्रे अशा एकूण 22 केंद्रांमध्ये विशेष बाब म्हणून मिनी सेतु केंद्र स्थापन करण्यात आलेली आहेत, सदर केंद्राच्या कार्यान्वयनासाठी केंद्रचालकांची निवड करावयाचे आहे.

त्याअनुषंगाने उपरोक्त 13 दादालोरा खिडकी केंद्रे व 9 आदि सेवा केंद्रे अशा एकूण 22 केंद्रांपैकी आरेवाडा (आदि सेवा केंद्र) व कोठी, धोडराज व नारगुंडा (दादालोरा खिडकी) अशा एकुण चार मिनी सेतू केंद्राच्या कार्यान्वयनासाठी या सोबत संलग्नित केलेली प्रेसनोट जास्तीत जास्त वृत्तपत्रामध्ये प्रकाशित होईल या हेतूने कार्यवाही करण्यात यावी.

सहपत्र :- प्रेस नोट

(अविश्यांत पंडा, भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, गडचिरोली

प्रतिलिपी:-

1. उपविभागीय अधिकारी, एटापल्ली यांना सुचित करण्यात येते की, 13 दादालोरा खिडकी केंद्रे व 9 आदि सेवा केंद्रे अशा एकूण 22 केंद्रांपैकी आरेवाडा (आदि सेवा केंद्र) व कोठी, धोडराज व नारगुंडा (दादालोरा खिडकी) अशा एकुण चार मिनी सेतू केंद्रांची यादी यासोबत संलग्नित करण्यात येत असून आपले कार्यालयाचे सुचना फलकावर नागरीकांकरीता प्रसिद्ध करण्यात यावी.
2. जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी यांनी सदर प्रेस नोट, अर्जाचा नमुना, अटी व शर्ती जिल्हाधिकारी यांचे संकेत स्थळावर प्रसिद्ध करावी.
3. तहसिलदार, भामरागड यांना सुचित करण्यात येते की, 13 दादालोरा खिडकी केंद्रे व 9 आदि सेवा केंद्रे अशा एकूण 22 मिनी केंद्रांपैकी आरेवाडा (आदि सेवा केंद्र) व कोठी, धोडराज व नारगुंडा (दादालोरा खिडकी) अशा एकुण चार मिनी सेतू केंद्रांची यादी यासोबत संलग्नित करण्यात येत

4. असून आपले कार्यालयाचे सुचना फलकावर व आपले अधिनस्त मंडळ अधिकारी व तलाठी साज्यामध्ये नागरीकांकरीता प्रसिद्ध करण्यात यावी.

5. जिल्हा नाझर, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांना सूचित करण्यात येते की, 13 दादालोरा खिडकी केंद्रे व 9 आदि सेवा केंद्रे अशा एकूण 22 मिनी सेतु केंद्रांपैकी आरेवाडा (आदि सेवा केंद्र) व कोठी, धोडराज व नारगुंडा (दादालोरा खिडकी) अशा एकुण चार मिनी सेतू केंद्रांची यादी यासोबत संलग्नित करण्यात येत असून जिल्हाधिकारी कार्यालयाचे सूचना फलकावर नागरीकांकरीता प्रसिद्ध करण्यात यावी.

जिल्हाधिकारी, गडचिरोली







जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय

(सेतू - शाखा)

कॉम्प्लेक्स एरीया, चंद्रपुर रोड गडचिरोली पिन कोड क्रमांक 442605

दुरध्वनी क्रमांक 07132-222005 ईमेलआयडी - rdcgadchiroli@gmail.com

क्रमांक /कार्या-7/म.स. सेतू/कावि 2145 /2026 दिनांक- 16 ऑक्टोबर, 2026
नोंदी.

प्रेस नोट

मिनी सेतु केंद्रांत (आपले सरकार सेवा केंद्र) केंद्रचालकाची नियुक्ती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) शासन निर्णय दिनांक 19 जानेवारी, 2018 अन्वये इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे शासन शुद्धीपत्रक क्रमांकःआसेकें-2026/प्र.क्र.98/TECH-1 (E-1742666) दिनांक 9 जुलै ,2026 व शासन निर्णय क्रमांकः मिसेकें-2026/प्र. क्र. 80/TECH-1 (E-1730492)दिनांक -16 जुलै, 2026 अन्वये जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील विद्यमान 13 दादालोरा खिडकी केंद्रे व 9 आदि सेवा केंद्रे अशा एकूण 22 केंद्रांमध्ये विशेष बाब म्हणून मिनी सेतु केंद्र स्थापन करण्यात आलेली आहेत, त्यापैकी आरेवाडा (आदि सेवा केंद्र) व कोठी, धोडराज व नारगुंडा (दादालोरा खिडकी) अशा एकुण चार मिनी सेतू केंद्राच्या कार्यान्वयनासाठी केंद्रचालकांची मानधन तत्त्वार निवड करणेकरिता ईछुक उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

करिता 4 मिनी सेतू केंद्रांची यादी व अर्जाचा नमुना, जिल्ह्याच्या वेबसाईट (www.gadchiroli.gov.in) या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, एटापल्ली व तहसिल कार्यालय भामरागड यांचे नोटिस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेली असून, अर्जदारांनी दिनांक 27/11 /2026 पर्यंत साक्षांकीत प्रतिसह संबंधित तहसिल कार्यालय (भामरागड) येथे विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

(अविश्यांत पंडा, भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, गडचिरोली

जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय

(सेतू - शाखा)

कॉम्प्लेक्स एरीया, चंद्रपुर रोड गडचिरोली पिन कोड क्रमांक 44260

दुरध्वनी क्रमांक 07132-222005 ई मेल आय डी-rdcgadchiroli@gmail.com

क्रमांक /कार्या-7/म.स. सेतू/कावि 2147 /2026 दिनांक - 16 ऑक्टोबर, 2026

जाहिरात

मिनी सेतू (आपले सरकार सेवा केंद्र) केंद्राकरीता केंद्रचालक नियुक्त करणेबाबत

महाराष्ट्र शासन, माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाचे शासन निर्णय क्र. मातंस-1716/प्र. क्र. 517/39 दिनांक 19 जानेवारी 2018 व इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे शासन शुद्धीपत्रक क्रमांकःआसेकें-2026/प्र.क्र.98/TECH-1 (E-1742666) दिनांक 9 जुलै ,2026 व शासन निर्णय क्रमांकः मिसेकें-2026/प्र. क्र. 80/TECH-1 (E-1730492)दिनांक -16 जुलै, 2026 अन्वये जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील विद्यमान 13 दादालोरा खिडकी केंद्रे व 9 आदि सेवा केंद्रे अशा एकूण 22 केंद्रांमध्ये विशेष बाब म्हणून मिनी सेतु केंद्र स्थापन करण्यात आलेली आहेत, त्यापैकी आरेवाडा (आदि सेवा केंद्र) व कोठी, धोडराज व नारगुंडा (दादालोरा खिडकी) अशा एकुण चार मिनी सेतू केंद्राच्या कार्यान्वयनासाठी केंद्रचालकांची निवड करणेकरिता ईछुक उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

1) **पदभरती विवरण**:

अनु. क्रं	पदनाम	एकूण पदे	एकत्रित मानधन	कार्याचे ठिकाण	कालावधी
1	केंद्रचालक	4	रु 8,000/-	मिनी सेतु केंद्र	11 महिने

2) **अर्ज स्विकारण्याचा कालावधी**:

अर्ज स्विकारण्याचा कालावधी	दिनांकः 17/11 /2026 ते 27/ 11 /2026 (कार्यालयीन वेळेत)
आपले सरकार सेवा केंद्र प्रक्रियेबाबत प्रसिद्धी	www.gadchiroli.gov.in
जाहिरातीबाबत सर्व माहिती वेळोवेळी जिल्हयाचे संकेतस्थळ www.gadchiroli.gov.in वर उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याकरीता या कार्यालयाशी संपर्क साधण्याची आवश्यकता नाही.	

उपरोक्त जाहिरातीच्या अनुषंगाने परिपूर्ण भरलेला अर्ज प्रमाणपत्राच्या स्वयं साक्षांकित प्रतिसह संबंधित तहसिल कार्यालय (भामरागड) येथे दिनांक 27/11/2026 सायं. 5.00 वाजे पर्यन्त सादर करावे. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. अर्जाचा नमूना व संपूर्ण जाहिरात जिल्ह्याचे संकेतस्थळ www.gadchiroli.gov.in वर उपलब्ध आहे.

3)**किमान पात्रता** :

अर्जदाराने खालील अटी पूर्ण करणे आवश्यक राहील .

1. किमान वय 18 वर्षे पूर्ण असावे.
2. किमान उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (HSC) उतीर्ण असावा.
3. संगणकाचे मूलभूत ज्ञान आवश्यक राहील. MSCIT किंवा समकक्ष प्रमाणपत्रास प्राधान्य देण्यात येईल.
4. संबंधित तालुक्याचा रहिवाशी असावा. (**इतर बाबी समान असल्यास संबंधित गावातील रहिवाशाला तद्नंतर संबंधित ग्रामपंचायत क्षेत्रातील रहिवाशाला, तद्नंतर संबंधित महसुल मंडळातील रहिवाशाला अशाक्रमाने प्राधान्य देण्यात येईल.**)
5. आधार क्रमांक, पॅन, बँक खाते व आवश्यक ओळखपत्र उपलब्ध असावे.
6. नैतिक अधःपतन , आर्थिक फसवणूक किंवा सायबर गुन्ह्याबाबत दोषी ठरलेला नसावा.

4) **अपात्रता निकष** :

खालील परिस्थितीत अर्जदारास ठरवण्यात येतील .

1. खोटी किंवा बनावट कागदपत्रे सादर करणे.
2. कोणत्याही शासकीय योजनेतून काळ्या यादीत समाविष्ट असणे.
3. आर्थिक फसवणूक अथवा सायबर गुन्ह्यांची प्रलंबित गंभीर प्रकरणे असणे.

5) **निवड प्रक्रिया :**

निवड समितीमार्फत अर्जदारांची संरचित मुलाखत घेण्यात येईल. मुलाखतीमधे खालील बाबींचे मूल्यांकन करण्यात येईल.

1. शासकीय सेवांचे ज्ञान
2. नागरिकाभिमुख सेवावृत्ती
3. डिजिटल प्रणाली हाताळण्याची क्षमता
4. समस्या सोडवण्याची क्षमता
5. संवाद कौशल्य
6. प्रामाणिकपणा व नैतिकता
7. माहिती गोपनीयता व डेटा सुरक्षा याबाबत जागरूकता

6) **अर्जा सोबत सादर करावयाचे दस्तवेज** :

1. आधार कार्ड
2. पॅन कॉर्ड
3. शैक्षणिक दस्तवेज (12 वी/ पदवी / पदव्युत्तर)
4. एमएस-सीआयटी (MSCIT) किंवा समकक्ष प्रमाणपत्र
5. रहिवासी पुरावा (रहिवासी दाखला/ घर टॅक्स पावती/पाणी बिल /राशन कार्ड / विद्युत बिल)
6. आपले सरकार सेवा केंद्राचा, सि.एस.सि किंवा संगकीय कामाचा अनुभव प्रमाणपत्र (असल्यास जोडावे.)
7. पोलीस चरित्र पडताळणी प्रमाणपत्र.

अटी व शर्ती :-

1. सदर नियुक्ती ही पूर्णपणे **कंत्राटी स्वरूपाची** असून उमेदवारास शासकीय सेवकाचा दर्जा प्राप्त होणार नाही.
2. नियुक्तीचा कालावधी सुरुवातीस 11 **महिने** किंवा समितीच्या आवश्यकतेनुसार राहील. समाधानकारक कामगिरीच्या आधारे कराराचा कालावधी वाढविण्याचा निर्णय संस्था घेईल.
3. कंत्राटी नियुक्तीमुळे कोणत्याही उमेदवारास नियमित शासकीय सेवेत समाविष्ट होण्याचा किंवा कायमस्वरूपी नियुक्तीचा कोणताही अधिकार प्राप्त होणार नाही.
4. उमेदवाराने अर्जात दिलेली सर्व माहिती खरी व अचूक असावी. कोणतीही माहिती खोटी अथवा दिशाभूल करणारी आढळल्यास उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.
5. निवड प्रक्रियेत अर्जांची छाननी, संगणक कौशल्य चाचणी, लेखी परीक्षा व/किंवा मुलाखत घेण्यात येऊ शकते. अंतिम निर्णय निवड समितीचा राहील.
6. आवश्यक शैक्षणिक पात्रता, संगणक ज्ञान व इतर अर्हता पूर्ण करणारे उमेदवारच निवड प्रक्रियेस पात्र राहतील.
7. निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्तीपूर्वी सर्व मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी सादर करणे आवश्यक राहील.
8. उमेदवाराची नियुक्ती समाधानकारक कामगिरी, शिस्त, उपस्थिती व कार्यालयीन गरज यावर अवलंबून राहील.
9. गैरवर्तन, निष्काळजीपणा, गोपनीयतेचा भंग, अनुपस्थिती किंवा कामात असमाधानकारक कामगिरी आढळल्यास संस्था कोणतीही पूर्वसूचना न देता करार समाप्त करण्याचा अधिकार राखून ठेवते.
10. उमेदवाराने कार्यालयीन वेळा, शासनाचे नियम, माहिती तंत्रज्ञान सुरक्षा नियम व गोपनीयता नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.
11. निवड झालेल्या उमेदवारास समितीने नेमून दिलेली कोणतीही कामे व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील.
12. जाहिरात रद्द करणे, पदांची संख्या वाढविणे/कमी करणे, पात्रतेमध्ये बदल करणे किंवा भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर स्थगित अथवा रद्द करण्याचा अधिकार समितीकडे राखीव राहील.
13. निवड प्रक्रियेसाठी उपस्थित राहण्याचा किंवा कागदपत्र पडताळणीसाठी येण्याचा कोणताही प्रवासभत्ता (TA) अथवा दैनिक भत्ता (DA) देय राहणार नाही.
14. या भरती प्रक्रियेसंदर्भातील सर्व सूचना संबंधित कार्यालयाच्या सूचना फलक किंवा अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. त्याची माहिती घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
15. या भरती प्रक्रियेसंदर्भात उद्भवणारे सर्व वाद संबंधित जिल्ह्याच्या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात राहतील.

(अविश्यांत पंडा, भा.प्र.से)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा सेतू समिती, गडचिरोली

मिनी सेतू केंद्र

(आपले सरकार सेवा केंद्र)

केंद्रचालक पदाकरीताकरीता अर्ज

अर्ज क्रमांक :

प्रति,

मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा सेतू समिती, गडचिरोली

अर्जदाराचे
फोटो

महोदय,

मी, केंद्राचालक पदाकरीता विहित नमुण्यात अर्ज सादर करत /करीत आहे,

(प्रथम नाव) (मधले नाव) (आडनांव)

अर्जदाराचे पुर्ण नाव :

.....

.....

जन्म तारीख (DD/MM/YYYY) : ..... लिंग : पु / स्त्री .....

वैवाहिक स्थिति : विवाहित / अविवाहित

आधार क्रं : .....

पॅन क्रं : ..... पॅन कार्ड वरील नाव

.....

बँक खाते क्रं: ..... बँकेचे

नाव:.....

अर्ज करावयाच्या केंद्र ठिकाणचे नाव :.....(रिक्त यादीतील केंद्राचे नाव लिहावे)

ग्राम पंचायत क्षेत्राचे नाव :.....

तालुक्याचे नाव:.....

जिल्ह्याचे नाव: ..... पिन कोड :

.....

कायमचा पत्ता :

.....

.....

तालुका : ..... जिल्हा :..... पिन

कोड :.....

मोबाईल क्रं :..... ई-मेल आयडी :

.....

(कृपया ॲक्टिव असलेलेच मोबाईल क्रमांक व ई- मेल आयडी लिहावे)

शैक्षणिक पात्रता :

शिक्षण (10 वी / १२ वी/ पदवी / पदव्युत्तर) :

.....

संगणक अहर्ता (MSCIT किंवा समकक्ष प्रमाणपत्र) : .....

अनुभव बाबत :

- सीएससी , महा- ई - सेवा केंद्र , बँकिंग प्रतींनिधी , ई - गव्हर्नंस किंवा तत्सम क्षेत्रातील अनुभव आहे काय ? : होय / नाही (होय असल्यास नमूद करावे)

  १).....
  .....
  २).....
  .....
  ३).....
  .....

चारीत्र पडताळणी :

- आपणावर कोणताही गुन्हा नोंदवलेला आहे का ? किंवा आपल्या विरोधात कोणतेही न्यायालयीन प्रकरण प्रलंबित आहे का ? : होय / नाही

  .....
  .....

****

अर्जदाराने अर्जासोबत द्यावयाचे स्वयंघोषणापत्र

प्रमाणित करण्यात येते की, मी श्री./श्रीमती----------
रा. ---------- ता. ----------जि.---------- येथिल रहिवाशी असून आपले कार्यालयाकडील https://gadchiroli.gov.in या संकेतस्थळावर ----------दादालोरा खिडकी/आदि सेवा केंद्राच्या केंद्रचालकाकरीता अर्ज सादर करीत आहे.

मला सोबतच्या जाहीरात व अर्जातील नमुद निकष, अटी व शर्ती तसेच मा. अध्यक्ष जिल्हा सेतू समिती तथा जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचा मिनी सेतू केंद्रांच्या केंद्रचालकाची निवड करणेबाबतचा अंतिम निर्णय मान्य आहे. याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

करीता मी आज दिनांक ----/----/2026 रोजी स्वतःचे स्वाक्षरीने स्वयंघोषणापत्र सादर करीत आहे.

अर्जदार

स्वाक्षरी :- ----------
नाव :- ----------
पत्ता:----------
दिनांक :----------

केंद्रचालकांची निवड करावयाच्या मिनी सेतू केंद्राची (आपले सरकार सेवा केंद्र) यादी

अ.क्र.	तालुक्याचे नाव	प्रस्तावित मिनी सेतू केंद्रांचे ठिकाण	दादालोरा खिडकी / आदि सेवा केंद्र
1	2	3	4
1	भामरागड	आरेवाडा	आदि सेवा केंद्र
2	भामरागड	कोठी	दादालोरा खिडकी
3	भामरागड	नारगुंडा	दादालोरा खिडकी
4	भामरागड	धोडराज	दादालोरा खिडकी

(अविश्यांत पंडा)
जिल्हाधिकारी, गडचिरोली